मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ऑनलाईन मालमत्ता कर भरण्यास पसंती

## 697 कोटींचा मालमत्ता कर ऑनलाईन भरणा; डिजिटल सेवांचा वाढता वापर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या सुलभ, तंत्रज्ञानाधारित उपक्रमांना नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मालमत्ता कर भरण्यासाठी ऑनलाईन माध्यमाला मोठी पसंती मिळत असल्याची माहिती उपायुक्त सचिन पवार यांनी यावेळी दिली.



गेल्या आर्थिक वर्षात, १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत एकूण ७ लाख ८७ हजार १८४ मालमत्ताधारकांपैकी ६ लाख ३१ हजार ६१५ मालमत्ताधारकांनी ९६१.७४ कोटी रुपयांचा मालमत्ता कर भरला आहे. यापैकी ५ लाख ११ हजार ६०३ मालमत्ताधारकांनी तब्बल ६९७.१९ कोटी रुपयांचा कर ऑनलाईन माध्यमातून भरत डिजिटल सुविधेचा वापर केला.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच उपायुक्त सचिन पवार यांच्या अधिपत्याखाली 'ऑनलाईन कर भरा' मोहिमेअंतर्गत सवलती, एसएमएस सूचना, सोशल मीडिया मोहिमा तसेच सार्वजनिक घोषणांद्वारे व्यापक जनजागृती करण्यात आली. या प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम म्हणून नागरिकांनी प्रत्यक्ष कार्यालयात जाण्याऐवजी घरबसल्या ऑनलाईन कर भरण्यास प्राधान्य दिले आहे.

महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर नागरिकांना मालमत्तेची माहिती, थकबाकी, सवलतींचा तपशील तसेच कर भरण्याची पावती डाउनलोड करण्याची सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे.पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करत असून, ऑनलाईन पेमेंट प्रणालीमुळे कर भरणे अधिक सुलभ झाले आहे.

### कर भरणा

- » ऑनलाईन : ६९७.१९ कोटी (७२.४९%)
- » चेक : ११९.१३ कोटी (१२.३९%)
- » रोख : १०४.८७ कोटी (१०.९०%)
- » डीडी : ७.०९ कोटी (०.७४%)
- » समायोजन : ३३.३८ कोटी (३.४७ %)
- » ईडीसी : ०.०६ कोटी (०.०१%)

**“ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कर भरणा प्रक्रियेत सुलभता आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यांना प्राधान्य दिले आहे. नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन माध्यमाचा स्वीकार केल्यामुळे घरबसल्या अधिक जलद पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने वेळ व श्रमांची बचत होत आहे..**

**- सचिन पवार, उपायुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

---

# सांगवी – बोपोडी पुलावरील विद्युत रोषणाई व सुशोभीकरण कामाचे 6 एप्रिलला लोकार्पण

## आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते लोकार्पण; पुलाचे "सरकार शितोळे सेतू" असे केले जाणार नामकरण

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मुळा नदीवरील सांगवी – बोपोडी पुलावरील विद्युत रोषणाई व सुशोभीकरण या कामाचे लोकार्पण तसेच पुलाचे 'सरकार शितोळे सेतू' अशा नामकरणाचा समारंभ सोमवार दि.६ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता सांगवी येथे आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते संपन्न होणार आहे, अशी माहिती महापौर रवि लांडगे यांनी दिली आहे.




या कार्यक्रमास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर रवि लांडगे असणार आहेत. याशिवाय विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ. अमोल कोल्हे, महेश लांडगे यांची या कार्यक्रमास विशेष उपस्थिती लाभणार आहे. प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार उमा खापरे, अमित गोरखे, शंकर मांडेकर, महापालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी याशिवाय शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी माई पठारे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे तसेच नगरसदस्य हर्षल ढोरे, बापू उर्फ शत्रुघ्न काटे, विठ्ठल उर्फ नाना काटे, शाम जगताप, शशिकांत कदम, नगरसदस्या तृप्ती कांबळे, उज्ज्वला ढोरे, अनिता काटे, कुंदा भिसे, शकुंतला धराडे यांच्यासह अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे तसेच नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांची उपस्थिती लाभणार आहे.

तरी या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.

# मेट्रो मार्गिका 3 दिरंगाईवर कारवाईचा इशारा

## पीएमआरडीए आयुक्तांचा कडक पवित्रा; मे 2026 डेडलाईन पाळण्याचे निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि आयटीनगरी हिंजवडीला जोडणारी बहुचर्चित पुणे मेट्रो मार्गिका 3 प्रकल्पाचे कामाच्या दिरंगाईबाबत पीएमआरडीए आयुक्तांनी मेट्रोची स्वतंत्र बैठक घेतली. बैठकीत आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना कामाची डेडलाईन पाळा, अन्यथा कारवाईस सामोरे जा, असा इशारा दिल्याने मेट्रोचा अभियांत्रिकी विभाग झटापून कामाला लागला आहे.

माण-हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो मार्गिका 3 प्रकल्पाच्या दिरंगाईमुळे आयुक्तांनी मार्च महिन्याच्या अखेरी सलग दोन बैठका घेतल्या. प्रत्यक्षात मार्च 2026 मध्ये हे काम पूर्ण होवून मेट्रो धावणे आवश्यक होते; परंतु विविध कारणे आणि कंत्राटदार कंपनीच्या वेळखाऊ प्रक्रियेमुळे हा प्रकल्प लांबला. दरम्यान, या कामात कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, अशा शब्दांत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी कंत्राटदार कंपनीला सुनावले. तसेच, खरमरीत पत्र पाठवून काम लवकर पूर्ण करा, असे स्पष्ट इशारा दिला आहे. मे 2026 पर्यंत पहिला टप्पा सुरु करण्याची डेडलाईन पाळा, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा गर्भित इशाराही त्यांनी दिला.

पुणे आयटीसीटी मेट्रो रेल लि. (पीआयटीसीएमआरएल) द्वारे राबविण्यात येत असलेल्या या प्रकल्पाच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यासाठी डॉ. चौधरी यांनी औंध येथील कार्यालयात बैठक घेतली होती. त्यानंतर पुन्हा बुधवारी अभियांत्रिकी विभागाची बैठक घेतली. अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, पीआयटीसीएमआरएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिलकुमार सैनी, पीएमआरडीएच्या मुख्य महानगर अभियंता रिनाज पठाण यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. दरम्यान, कामाचा आढावा घेण्यासाठी बुधवार (दि. 1) पुन्हा आढावा घेतल्याने अभियांत्रिकी विभाग खडबडून जागा झाला आहे.



### डेडलाईन पाळा, अन्यथा कारवाई

**» पुणे मेट्रो मार्गिका ३ प्रकल्पाच्या दिरंगाईमुळे पीएमआरडीए प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गावरील काम अपेक्षित वेळेत पूर्ण न झाल्याने आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन स्पष्ट इशारा दिला. मे २०२६ पर्यंत पहिला टप्पा सुरू करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले असून, विलंब सहन केला जाणार नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. सतत आढावा बैठका घेतल्या जात असून, अभियांत्रिकी विभागाने कामाला गती दिली आहे.**

### पहिला टप्पा सुरू करा

**» मेट्रो मार्गावरील तांत्रिक आणि स्थापत्य (सिव्हिल) कामांच्या सद्यस्थितीची माहिती घेत पहिला टप्पा सुरु करा, असे सुचवले आहे. मेट्रोसाठी लागणारे मनुष्यबळ, तांत्रिक सुविधा आणि प्रलंबित असलेली स्थापत्य कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. शेवटच्या टप्प्यातील कनेक्टिव्हिटीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पहिला टप्पा मे 2026 अखेरपर्यंत प्रवाशांसाठी खुला करण्याचे नियोजन आहे. या पहिल्या टप्प्यात 12 स्थानकांचा समावेश राहील.**

> **प्रकल्पाचा वेळोवेळी आढावा घेत आहे. हा प्रकल्प लवकर सुरू करण्याचा मानस आहे. पहिल्या टप्प्यासाठी मे 2026 ची डेडलाईन पाळण्यासाठी तांत्रिक व इतर कामांना गती देण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला दिले आहेत.**
> **- डॉ. अभिजित चौधरी, आयुक्त, पीएमआरडीए.**

# पवना धरणात 46.55% पाणीसाठा; पिंपरी-चिंचवडला पावसाळ्यापर्यंत पुरेसा

## उन्हामुळे साठा झपाट्याने घटतोय; वाढत्या पाण्याच्या मागणीमुळे प्रशासन सतर्क


**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची तहान भागविणाऱ्या पवना धरणात शनिवारी (दि.4) सकाळी आठपर्यंत 46.55 टक्के पाणीसाठा शिल्लक होता. तीव उन्हामुळे तसेच, पाण्याची मागणी वाढल्याने पाण्याचा साठा वेगात कमी होत आहे. हा साठा पिंपरी-चिंचवड शहराला पावसाळ्यापर्यंत म्हणजे जून महिन्यापर्यंत पुरेल इतका आहे.

मावळ तालुक्यातील पवनानगर येथील पवना धरणातून पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा केला जातो. महापालिकेकडून पवना नदीवरील रावेत येथील बंधाऱ्यातून दररोज 520 एमएलडी पाणी उचलले जाते. पाण्यावर प्रक्रिया करून पिण्यायोग्य पाणी संपूर्ण शहराला पुरवले जाते. एमआयडीसीकडून 30 एमएलडी पाणी घेऊन शहरातील काही भागास पुरवले जात आहे. आंद्रा धरण पाणी योजनेअंतर्गत निघोजे येथील इंद्रायणी नदी बंधाऱ्यातून दररोज 80 ते 90 एमएलडी पाणी उचलून चिखली जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध करून त्या परिसरात पुरवले जात आहे.

नागरिकांनी पाण्याची बचत करावी. नासाडी करू नये. पाण्याची गळती होऊ नये, या साठी नादुरुस्त नळ व जोड दुरुस्त करून घ्यावेत. आवार, अंगण, रस्ते, जिने तसेच, वाहन धुण्यासाठी पिण्याचा पाण्याचा वापर करू नये. शिल्लक पाणी दुसऱ्या दिवशी फेकून देऊ नये, असे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

गेल्या सव्वासहा वर्षांपासून दोन दिवसातून एकदा पाणीपुरवठा होत आहे. तीव उन्हामुळे पवना धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. धरणात शनिवारी (दि.4) सकाळी आठपर्यंत 46.55 टक्के पाणीसाठा होता. त्या धरणातून पिंपरी-चिंचवड शहर, एमआयडीसी, काही नगरपालिका व ग्रामपंचयातीला पाणी दिले जाते. सध्याचा पाणीसाठा पिंपरी-चिंचवड शहराला पावसाळ्यापर्यंत पुरेल इतका आहे.



### आंद्रा धरणात 53.68 टक्के साठा

**» आंद्रा धरणात सध्या 53.68 टक्के पाणी शिल्लक आहे. त्या योजनेतून निघोजे येथील इंद्रायणी नदी बंधाऱ्यातून 80 ते 90 एमएलडी पाणी दररोज उचलले जाते. तर, भामा आसखेड धरणात 62.37 टक्के पाणीसाठा आहे. अद्याप तो प्रकल्प पूर्ण न झाल्याने शहर 167 एमएलडी पाण्यापासून वंचित आहे. तर, मुळशी धरणात 45.24 टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. तेथील पाणी मुळा नदीस सोडले जाते.**

### नागरिकांनी पाण्याची नासाडी करू नये

**» शहरातील नागरिकांनी पाण्याची बचत करावी. नासाडी करू नये. पाण्याची गळती होऊ नये, या साठी नादुरुस्त नळ व जोड दुरुस्त करून घ्यावेत. आवार, अंगण, रस्ते, जिने तसेच, वाहन धुण्यासाठी पिण्याचा पाण्याचा वापर करू नये. शिल्लक पाणी दुसऱ्या दिवशी फेकून देऊ नये, असे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी सांगितले.**

# पावसाळी समस्यांवर महापालिकेचा ॲक्शन प्लॅन

## आपत्ती व्यवस्थापन कक्ष 24 तास सुरू; महापालिकेकडून दीर्घकालीन उपाययोजनांवर भर

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात दोन दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक भागांमध्ये पाणी साचण्याच्या घटना घडल्याच्या पार्श्वभूमीवर शहरात पाणी साचणाऱ्या भागांसाठी कृती आराखडा तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, सुटीच्या दिवशीही आपत्ती व्यवस्थापन कक्ष कार्यरत ठेवण्याचे ठरविण्यात आले आहे.

महापालिकेचे सभागृहनेते गणेश बिडकर यांनी आपत्ती व्यवस्थापन कक्षात प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यामध्ये हे निर्णय घेण्यात आले. मलनिःसारण व देखभाल दुरुस्ती विभागाचे मुख्य अभियंता जगदीश खानोरे, पथ विभागाचे राजेश बनकर, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी गणेश सोनुने, नगरसेविका अर्चना जगताप, वृषाली कामठे, पूजा कदम आदी या वेळी उपस्थित होते.

'शहरातील पाणी साचणाऱ्या संवेदनशील भागांवर लक्ष केंद्रित करून तत्काळ उपाययोजना करण्याबरोबरच भविष्यात अशा परिस्थितीची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी दीर्घकालीन नियोजन करावे. ड्रेनेज व्यवस्थेतील त्रुटी दूर करून पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत होईल, यासाठी व्यापक योजना आखण्यात याव्यात,' अशा सूचना बिडकर यांनी केल्या.

'महापालिकेचा आपत्ती व्यवस्थापन कक्ष हा आता पूर्ण क्षमतेने कार्यरत ठेवण्यात येणार आहे. त्यासाठी सुटीच्या दिवशीही हा विभाग सुरू राहणार आहे. त्यामुळे २४ तास नागरिकांना सेवा मिळू शकणार आहे.' असे त्यांनी स्पष्ट केले.




### पाणी साचणाऱ्या भागांसाठी कृती आराखडा

» अतिवृष्टीमुळे शहरातील विविध भागांमध्ये पाणी साचल्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने ठोस पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. संवेदनशील भागांची ओळख करून तत्काळ उपाययोजना करण्याबरोबरच भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी दीर्घकालीन नियोजन करण्यात येणार आहे. ड्रेनेज व्यवस्थेतील त्रुटी दूर करून पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत करण्यावर भर दिला जाणार आहे.

**महापालिकेच्या तीन अतिरिक्त आयुक्तांकडील खात्यांमध्ये बदल...**

अतिरिक्त आयुक्त (विशेष) ओमप्रकाश दिवटे यांच्याकडे मिळकत कर आकारणी, प्रकल्प आणि माहिती व तंत्रज्ञान विभागासह २३ विभागांचा कार्यभार देण्यात आला आहे. उर्वरित दोन अतिरिक्त आयुक्तांकडील खात्यांचा कार्यभार कमी करून अनुक्रमे १७ आणि १८ विभागांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

प्रजित नायर यांनी पदभार स्वीकारल्यानंतर महापालिका आयुक्त राम यांनी तीन अतिरिक्त आयुक्तांकडील खात्यांमध्ये बदल केला आहे. राज्य शासनाच्या सेवेतील अधिकारी ओमप्रकाश दिवटे यांच्याकडे यापूर्वी पथ विभाग, मालमत्ता व्यवस्थापन विभाग, भूसंपादन व व्यवस्थापन विभाग, भांडार, एस. आर. ए, ऑप्टिकल फायबर इन्फ्रास्ट्रक्चर विभाग यांसह २० विभागांचा कार्यभार होता. आता त्यांच्याकडे पृथ्वीराज बी. पी. यांच्याकडे असलेल्या मिळकत कर, माहिती व तंत्रज्ञान आणि प्रकल्प या मोठ्या विभागांसह समाज विकास व समाज कल्याण विभागांचीही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

### आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज

» महापालिकेचा आपत्ती व्यवस्थापन कक्ष आता पूर्ण क्षमतेने २४ तास कार्यरत ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सुटीच्या दिवशीही हा विभाग सुरू राहणार असून नागरिकांना तात्काळ मदत मिळणार आहे. या निर्णयामुळे आपत्कालीन परिस्थितीत जलद प्रतिसाद देणे शक्य होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

> पुणे शहरात अतिवृष्टी झाल्यास कोणत्याही भागात पाणी साचू नये, यासाठी ड्रेनेज व्यवस्थेत दीर्घकालीन सुधारणा करणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित विभागांनी कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना करण्यात आल्या.
>
> - गणेश बिडकर, सभागृह नेते, पुणे महापालिका.

---

# पुण्यातील अनधिकृत इंटरनेट केबल रडारवर; 'वर्क फ्रॉम होम'ला फटका

## महापालिकेकडून अनधिकृत ओव्हरहेड केबलवर कारवाई; इंटरनेट व टीव्ही सेवा प्रभावित

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील अनधिकृत ओव्हरहेड केबलविरोधात महापालिकेने कारवाई सुरू करण्यापूर्वी केबल व्यावसायिकांशी अनेक बैठका घेतल्या होत्या. त्यांना सुधारणा करण्यासाठी काही प्रस्तावही दिले होते. मात्र त्यांच्याकडून योग्य प्रतिसाद मिळाला नाही.

आता महापालिकेने अनधिकृत केबलवर कारवाई सुरू केल्याने इंटरनेट बंद पडून त्याचा थेट फटका 'वर्क फ्रॉम होम' करणाऱ्या नोकरदारांना बसला आहे. कारवाई यापुढेही सुरूच राहणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.



पुणे शहरात हजारो किलोमीटर लांबीच्या अनधिकृत ओव्हरहेड केबल आहेत. यातून सुमारे १० हजार कोटी रुपयांचे उत्पन्न मिळू शकते. चार वर्षांपूर्वी यासंदर्भातील प्रस्ताव आला होता. पण तो बारगळला. आता पुन्हा महापालिकेने बेकायदेशीर ओव्हरहेड केबलवर कारवाई सुरू केली आहे. केबल व्यावसायिकांनी महापालिकेला शुल्क भरावे आणि भूमिगत केबल टाकून घ्याव्यात, अशी भूमिका स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी घेतली आहे.

केबल व्यावसायिकांशी अनेक बैठका घेतल्या होत्या. त्यांना सुधारणा करण्यासाठी काही प्रस्तावही दिले होते. मात्र त्यांच्याकडून योग्य प्रतिसाद मिळाला नाही. आता महापालिकेने अनधिकृत केबलवर कारवाई सुरू केल्याने इंटरनेट बंद पडून त्याचा थेट फटका 'वर्क फ्रॉम होम' करणाऱ्या नोकरदारांना बसला आहे. कारवाई यापुढेही सुरूच राहणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, महापालिकेने सातारा रस्ता, पुण्याईनगर आणि धनकवडी परिसरात सलग तीन दिवस कारवाई केली. यात दोन ट्रक भरून केबल जप्त केल्या आहेत. त्याचा फटका या भागातील इंटरनेट, टीव्ही नेटवर्कला बसला आहे. अनेक कंपन्या त्यांच्या कर्मचाऱ्यांना अजूनही वर्क फ्रॉम होम देत आहेत. पण या कारवाईमुळे इंटरनेट सेवा बंद झाल्याने नोकरदारांची तारांबळ उडाली आहे. यासंदर्भात विद्युत विभागातील अधिकाऱ्यांनी भूमिका स्पष्ट केली. "केबल कंपन्यांना वारंवार सूचना देऊनही त्यांनी नियमांचे पालन केले नाही. अनेक ठिकाणी केबल धोकादायक पद्धतीने टाकल्याने वीज यंत्रणेलाही धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे ही कारवाई सुरू केली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

> "१० वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून सुमारे १० हजार किलोमीटरपेक्षा जास्त अनधिकृत केबल शहरात आहेत. या व्यावसायिकांनी महापालिकेचे कोट्यवधींचे उत्पन्न बुडविले आहे. यापूर्वी त्यांना नोटिसा दिल्या होत्या. पण आता महापालिका कठोर कारवाई करणार, स्वतःहून केबल काढली नाही, तर गुन्हे दाखल केले जाणार आहेत."
>
> - श्रीनाथ भिमाले, अध्यक्ष, स्थायी समिती, पुणे महापालिका.

# बारामती पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी; रामदास आठवलेंची भूमिका

## निवडणूक झाल्यास सुनेत्रा पवारांच्या प्रचारात उतरणार; विरोधकांनी उमेदवारी टाळावी अशी मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणूक बिनविरोध झाली पाहिजे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला होता. त्यामुळे निवडणूक झालीच, तर त्यांच्या प्रचारासाठी बारामतीला जाणार आहे, अशी भूमिका केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मांडली.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ही निवडणूक लढण्याचा आग्रह सोडण्याबाबत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी त्यांना तशा सूचना द्याव्या, असेही त्यांनी नमूद केले.

रिपब्लिकन पक्षाची राज्य कार्यकारिणी आणि प्रमुख नेत्यांची बैठक येथे पार पडली. या बैठकीला राज्य अध्यक्ष राजाभाऊ सरोदे, प्रदेश सरचिटणीस अविनाश महातेकर, गौतम सोनावणे, प्रदेश कार्याध्यक्ष बाबूराव कदम, राष्ट्रीय सरचिटणीस आशा लांडगे, बाळसाहेब जानराव, पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, संजय सोनवणे या वेळी मान्यवर उपस्थित होते.



बारामती येथील पोटनिवडणुकीबाबत आठवले म्हणाले, बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध झाली पाहिजे. अजित पवार यांच्यासारखा मोठा नेता राज्याने गमावला आहे. त्यांच्या अपघात प्रकरणाची चौकशी सुरू आहे. मात्र, ही चौकशी सीबीआयकडे देण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृहमंत्री अमित शहा यांना पत्र दिले आहे. पोटनिवडणुकीबाबत सुनेत्रा पवार यांच्याशी बोलणे झाले. मात्र, निवडणूक झाल्यास त्यांच्या प्रचाराला जाणार आहे. तसेच आमचे कार्यकर्ते ही प्रचार करतील.

लोकसभेत महिलांसाठी २७३ जागा वाढवण्याबाबत आता विशेष अधिवेशन बोलावण्यात आले आहे. त्यात महिलांबाबतचे विधेयक मांडले जाणार आहे. त्यामुळे महिलांच्या जागांमध्ये वाढ होऊन त्या ८१६ होणार आहेत. त्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींना वेगळे आरक्षण असणार आहे, अशी माहिती आठवले यांनी दिली.

घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चवदार तळे आंदोलनाच्या शताब्दी वर्षानिमित्त रिपब्लिकन पक्षातर्फे वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. त्यानुसार राज्यव्यापी समता परिवर्तन यात्रा १४ ऑक्टोबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्री भीमाई यांचे स्मारक असलेल्या सातारा येथून केला जाणार आहे, तर महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जन्म द्विशताब्दी वर्षाचे औचित्याने १० नोव्हेंबर रोजी पुणे येथे करण्यात येणार आहे.

### इतर राजकीय भूमिका स्पष्ट

**» बैठकीदरम्यान आठवले यांनी विविध राजकीय मुद्द्यांवर भूमिका मांडली. पश्चिम बंगालमध्ये भाजप व राष्ट्रीय लोकशाही आघाडीला पाठिंबा देणार असल्याचे त्यांनी सांगितले. तामिळनाडू व आसाममध्ये पक्षाचे उमेदवार उभे राहतील, तर पुदुच्चेरीत एनडीएला पाठिंबा दिला जाईल. महिलांसाठी जागा वाढवण्याच्या विधेयकाचे स्वागत करताना इतर मागासवर्गीय व भटके विमुक्त समाजालाही राजकीय आरक्षण देण्याची मागणी त्यांनी पुन्हा एकदा मांडली.**

### बिनविरोध निवडणुकीची भूमिका

**» उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक होणार आहे. ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी भूमिका केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मांडली. सुनेत्रा पवार यांनी त्यांच्याशी संपर्क साधल्याचे सांगत, राज्याने मोठा नेता गमावल्यामुळे ही निवडणूक सन्मानाने पार पडावी, असे त्यांनी नमूद केले. विरोधकांनीही उमेदवारी न देता एकमताने निर्णय घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.**

### प्रचारात उतरण्याची तयारी

**» पोटनिवडणूक झालीच तर सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी बारामतीत जाणार असल्याचे आठवले यांनी स्पष्ट केले. त्यांच्या पक्षाचे कार्यकर्तेही प्रचारात सक्रिय सहभाग घेतील, असे त्यांनी सांगितले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी निवडणूक लढवू नये, यासाठी राहुल गांधी यांनी हस्तक्षेप करावा, अशी मागणीही त्यांनी केली.**

# शिरूरमध्ये दोन बिबटे जेरबंद; वन विभागाची कारवाई वेगात

## पिंपळसुटीत नर-मादी बिबटे जेरबंद; माणिकडोह केंद्रात हलविले, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील पिंपळसुटी येथे दोन बिबटे जेरबंद करण्यात वन विभागाला यश आले. आतापर्यंत शिरूर परिसरातून ५३ बिबट्यांना पकडण्यात आले आहे.

पिंपळसुटी येथे लावलेल्या दोन पिंजऱ्यांत दोन बिबटे जेरबंद झाले. एक नर आणि दुसरी मादी आहे. त्यांचे वय सुमारे दीड वर्ष आहे. दोन्ही बिबटे एकाच मादीची पिले असून, त्यांना वेगवेगळ्या पिंजऱ्यांत जेरबंद करण्यात आले. त्यानंतर दोघांना एकाच पिंजऱ्यात ठेवण्यात आले. दोघांना माणिकडोह बिबट निवारा केंद्रात दाखल करण्यात आले असल्याची माहिती तालुका वनाधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी दिली. शिरूर तालुक्यात गेल्या काही महिन्यांपासून बिबट्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.



बिबट्यांच्या हल्ल्यात काही जणांना प्राण गमवावा लागल्याच्या घटनांमुळे परिस्थिती गंभीर बनली होती. या पार्श्वभूमीवर, वन विभागाने शिरूर तालुक्यातील बिबट्यांच्या प्रभावक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पिंजरे लावण्याची मोहीम हाती घेतली. आतापर्यंत ३५ हून अधिक बिबट्यांना जेरबंद करण्यात वन विभागाला यश आले असून, या बिबट्यांची रवानगी जुन्नर तालुक्यातील माणिकडोह बिबट निवारा केंद्रात करण्यात आली.

बिबट्यांची वाढती संख्या आणि त्यातून निर्माण होणारा बिबट्या-मानव संघर्ष लक्षात घेता, नागरिकांनी रात्रीच्या वेळी शेतात किंवा मोकळ्या परिसरात जाताना खबरदारी घ्यावी, असे आवाहन गव्हाणे यांनी केले आहे.

### बिबट्यांचा वाढता धोका

**» शिरूर तालुक्यातील पिंपळसुटी येथे दोन बिबटे जेरबंद करण्यात वन विभागाला यश आले आहे. सुमारे दीड वर्षांचे नर व मादी असे दोन्ही बिबटे वेगवेगळ्या पिंजऱ्यांत पकडून नंतर एकत्र ठेवण्यात आले. त्यांची माणिकडोह बिबट निवारा केंद्रात रवानगी करण्यात आली आहे. परिसरात बिबट्यांची संख्या वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर वन विभागाने पिंजरे लावण्याची मोहीम राबवली असून, नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**